# प्रेसनोट दि १५/०८/१९

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडुन जुगार अडयावर छापा.

दि १४/०८/२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे शाखेकडील पोलीस शिपाई ८७५१ शशांक खाडे यांना आरण्येश्वर अखिल तावरे कॉलनी मित्र मंडळ पुणे येथे तीन पत्ती जुगार चालु असलेबाबत गोपनीय माहिती मिळालेने वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री भागवत मिसाळ व पो उपनिरी खडके सामाजिक सुरक्षा विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली तात्काळ बातमीची पडताळणी करुन आरण्येश्वर अखिल तावरे कॉलनी मित्र मंडळ पुणे येथे तीन पत्ती जुगार अड्ड्यावर छापा टाकुन रोख रक्कम ६६०४०/- व जुगाराचे साहित्य २२००/- असा एकुण ६८२४०/- रुपयांचा किमतीचा मुद्देमाल व रोख रक्कम तसेच सदर जुगार खेळणारे २३ लोकांविरुध्द दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं ३७५/१९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.

वरील नमुद कारवाई श्री बच्चनसिंग पो.उप.आयुक्त गुन्हे शाखा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री भागवत मिसाळ पोलीस निरीक्षक वैशाली चांदगुडे यांचे मार्गदर्शनाखाली पो उप निरी खडके, पो.हवा ८८४ क्षीरसागर, पो ना ६९७३ पठाण, पो ना १७०४ माने, पो शि ८२१७ कोळगे, पो शि ८७०२ भांडवलकर, पो शि ८८३४ चव्हाण,पो शि ८७५१ खाडे सर्व सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा,पुणे शहर व दत्तवाडी पोलीस स्टेशन कडील स्टाफ यांनी केलेली आहे.